**स्थायी निदेश क्र.२३-अ**

**नगरपरिषदेच्या आस्थापनेवर**
**पद भरतीबाबत सुधारीत आदेश**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**क्र: नप्रसं२००३/प्र.क्र.२५० /०४/४**
**दिनांक :१ ऑगस्ट २००६**

वाचा:
१) शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.९.२००१
२) या कार्यालयाचे पत्र क्र.नप्रसंई २००१/प्र.क्र.१८१/२००१/७, दिनांक २८.३.२००२
३) शासन नगर विकास विभाग परिपत्रक क्र. जीईएन १०८९/७४४/सीआर-२३५/८९/नवि-१४, दिनांक १४.८.१९९०
४) स्थायी निदेश क्र. २३ क्र.नप्रस २००३/प्र.क्र.२५०/०४/४, दि.१९.१०.२००४
५) स्थायी निदेश क्र. २३(पुरक-१) क्र.नपप्रस/अनुकंपा/२००३/प्र.क्र.२५०/२६, दि.७.१०.२००५
६) स्थायी निदेश क्र.२३ (पुरक-२) क्र. नपप्रस/अनुकंपा/२००३/प्र.क्र. २५०/२६, दि.२४ नोव्हेंबर, २००५

**प्रस्तावना**

०१. नगरपरिषदेच्या आस्थापनेवर पद भरतीबाबत या संचालनालयाने स्थायी आदेश क्र.२३ दिनांक १९.१०.२००४ अन्वये निर्गमित करण्यात आला होता त्यास वेळोवेळी झालेल्या सुधारणांचा समावेश करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश देण्यांत येत आहेत.

०२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६(१) नुसार नगरपरिषदेच्या आस्थापनेवर पदनिर्मितीचे अधिकार तसेच कलम ७६(२) नुसार नगरपरिषद आस्थापनेवर पदांची अर्हता, वेतन भत्ते व सेवेच्या शर्ती तसेच त्यांच्या सेवाप्रवेशाच्या पध्दती विहित करण्याचे अधिकार आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना आहेत.

०३. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील पदनिर्मितीबाबत आदेश वेळोवेळी जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त व संचालक यांनी निर्गमित केले आहेत. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचे आदेश वेगवेगळ्या प्राधिकरणाने मंजूर केले असल्याने एकत्रित आदेश उपलब्ध होत नाहीत. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ लागू होण्यापूर्वी कांही नगरपरिषदांमध्ये पदे अस्तित्वात असल्यामुळे काही पदांच्या पदनिर्मितीचे आदेश उपलब्ध नाहीत. त्याचप्रमाणे आदेशात खूप विसंगती (पदनाम, वेतनश्रेणी, शैक्षणिक अर्हता) निदर्शनास येते. विशेषत विदर्भ व मराठवाडयातील नगरपरिषदांच्या आस्थापनेवरील पदांच्या पदनामामध्ये, विविधता आहे. कांही नगरपरिषदा स्वातंत्र्यपूर्व काळातील असून त्यावेळी मंजूर असलेली पदांची वर्तमानकाळात आवश्यकता नाही. (उदा.लायटिंग बॉय इ.). त्याचप्रमाणे शासनाच्या बदलत्या धोरणानुसार नगरपरिषदेमधील जकात विभाग, दुकान आस्थापना, इ. विभाग बंद झाल्यामुळे अनेक पदे रद्द झालेली आहेत. तसेच नगरपरिषदेकडील दवाखाना विभाग शासनाकडे हस्तांतरीत करण्याचे धोरण असल्यामुळे या विभागातील नगरपरिषदेमधील पदांची आवश्यकता नाही. तांत्रिक, यांत्रिक व व्यवस्थापकीय तसेच अधिनियमातील बदलामुळे बदलत्या परिस्थितीनुरुप कर्मचारी व्यवस्थापन असणे आवश्यक ठरले आहे.

०४. शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा दि.१०.९.२००१ अन्वये पदनिर्मिती, पदभरती व पदांचे पुनरुज्जीवन याबाबतचे निर्बंध व अनुषंगिक आढावे या बाबतीत आदेश निर्गमित केलेले आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येक नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील मंजूर पदांचा तसेच पदे मंजूरीशिवाय रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांसह ज्या कर्मचाऱ्यांना कामावर लावले असेल त्या सर्वांचा एकत्रित आढावा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत सादर

करण्याबाबत संचालनालयाच्या दि. २८.३.२००२ च्या पत्रान्वये नगरपरिषदांना निदेश दिले आहेत. वरील आढाव्यानंतर एक सर्वसमावेशक आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

०५. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील रिक्त पद भरण्याबाबत कोणती पध्दती अनुसरावी याची विचारणा नगरपरिषदेकडून या संचालनालयाकडे करण्यांत येत असते. एकाच पदानामाचे पदांची शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणी वेगवेगळ्या आदेशामध्ये वेगवगळी नमूद असल्यामुळे पदोन्नतीसाखळीतील वरिष्ठ पदांबाबत संभ्रम असल्याने नगरपरिषदेच्या स्थरावर पद भरती करतांना अडचणी निर्माण होत असतात व त्यासाठी एकसूत्रता असणे आवश्यक आहे.

०६. नगरपरिषद आस्थापनेवरील पदांच्या सेवेच्या शर्ती व सेवा प्रवेशाच्या पध्दती याबाबतीत संचालकांनी या कार्यालयाचे आदेश क्र. इएसटी/११८४/प्र.क्र.२१/५, दि. १४.५.१९८४ निर्गमित केले होते. (त्यामध्ये झालेल्या वेळोवेळी सुधारणा आदेश क्र: डब्ल्युपी/२००१/प्र.क्र.४/२००१/४/५, दि. २२ जानेवारी २००४). नगरपरिषदांना १४.५.८४ पासून महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू केल्यानंतर शासन नगर विकास विभाग, वित्त विभाग आणि सामान्य प्रशासन विभाग यांनी सेवेच्या भरती व सेवाप्रवेशाच्या बाबतीत नगरपरिषदांच्या पदांच्या भरतीबाबत वेळोवेळी आदेश, निदेश निर्गमित केलेले आहेत. हे सर्व आदेश कांही नगरपरिषदांमध्ये उपलब्ध नाहीत असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सर्व सूचनांचे सुसुत्रिकरणाच्या दृष्टीकोणातून यापूर्वीचे आदेशाचा पुनरुच्चार करणे आवश्यक आहे.

०७. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त असलेली परंतु नगरपरिषदेला आवश्यक असणारी पदे भरण्यापूर्वी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन यांचे मान्यतेची आवश्यकता असते. नगरपरिषदेच्या गतीमान कामकाजाच्या दृष्टीने नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील रिक्त झालेली पदे भरण्याबाबत व व्यपगत झालेली पदे पुर्नजिवित करण्याबाबत होत असलेला विलंब विचारात घेऊन व पुर्नजिवित पद करण्याबाबत संचालनालयाची मान्यता घेण्यास लागणारा विलंब टाळण्यासाठी नगरपरिषद आस्थापनेवरील कांही आवश्यक पदे जरी सहा महिन्याच्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी रिक्त असली तरी ती पदे पुर्नजिवित करण्यासाठी या संचालनालयाच्या मान्यतेची पुन्हा आवश्यकता राहणार नाही याचा विचार करुन नगरपरिषदांना सूचना निर्गमित करणे आवश्यक आहे.

०८. राज्यातील सुमारे १०८ नगरपरिषदांचे कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन व भत्ते २ किंवा अधिक महिन्यांसाठी थकीत आहेत. यातील काही नगरपरिषदांनी कर्मचाऱ्यांना मागील सहा महिन्यापेक्षा जास्त काळ वेतन प्रदान करता आलेले नाही ही अवस्था आस्थापनेवरील अनियमित व अनावश्यक नेमणूका, पदांचा वेळीच आढावा न घेणे, रोजंदारीवर कर्मचारी नियुक्त करुन त्यांना कायम सेवेत सामावून घेण्याची कृती यामुळे नगरपरिषदांवर आर्थिक दायित्व वाढविण्यास मदत होते व त्यामुळे नगरपरिषदांचे आस्थापनेवरील मंजूर पदे व त्यावरील नियुक्त्या या संदर्भात वरील सर्व कारणमिमांसा विचारात घेऊन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ (१) व (२) नुसार संचालकांना प्राप्त असलेल्या अधिकारात मार्गदर्शक तत्वे विहित करण्याची गरज विचारात घेऊन खालील आदेश निर्गमित करणेत येत आहेत.

## आ दे श

### आकृतीबंधास मान्यता घेणे

०९. वित्त विभागाच्या क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/०१/वित्तीय सुधारणा दिनांक १०.९.२००१ च्या शासन निर्णयानुसार पदांचा आढावा उच्च स्तरीय समितीस सादर करण्याबाबत सूचना देण्यांत आल्या होत्या. शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.मागास २२२००२/ ५१०/प्र.क्र.५३/२००२/नवि-६ दिनांक १७ ऑगस्ट २००२ मध्ये नगरपरिषदेच्या पदांचा आढावा उच्च स्तरीय समितीस सादर करण्यापासून सूट देण्यांत आली आहे. मात्र महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ (१) व (२) नुसार नगरपरिषदेने संचालनालयाकडून मंजूर पदांच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. उपरोक्त वाचा क्र.२ येथे नमूद केलेल्या या संचालनालयाच्या दिनांक २८.३.२००२ च्या पत्रानुसार आढाव्याअंती नगरपरिषदेचे पदनिर्मितीबाबतचे सर्व आदेश रद्द करुन सर्वसमावेशक आदेश निर्गमित केल्याशिवाय नगरपरिषदेस रिक्त पदे भरता येणार नाहीत.

**नगरपरिषद आस्थापनेवरील खालील रिक्त पदे भरता येतील**

१०. ज्या नगरपरिषदेने पदांच्या आकृतीबंधास संचालनालयाची मान्यता घेतलेली आहे, अशी मान्यता घेतल्यानंतर सदरचा आकृतीबंध आदेशाच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध राहील. आकृतीबंधाच्या आदेशास ५ वर्षे झाल्यानंतर पुन्हा या संचालनालयाकडून सुधारीत आकृतीबंधास मान्यता घेणे बंधनकारक राहील. सुधारीत आकृतीबंधाच्या आदेशामध्ये नमूद केलेली नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील स्थायी पदे पुढील ५ वर्षामध्ये रिक्त झाल्यास खाली नमूद केलेल्या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीने नगरपरिषद भरु शकेल यासाठी संचालनालयाच्या मान्यतेची आवश्यकता असणार नाही.

**अस्थायी पदे**

११. नगरपरिषदेच्या मंजूर आकृतीबंधातील अस्थायी पद, त्या पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास किंवा अन्य कारणाने अस्थायी पद रिक्त झाल्यास अस्थायी पद निष्कापित होईल. याशिवाय स्थायी पद रिक्त झाल्यास अस्थायी पदावरील कर्मचाऱ्यास जेष्ठतेनुसार स्थायी पदावर वर्ग करण्यात यावे व त्यानंतर अस्थायी पद निष्कापित होईल.

**पदाची श्रेणी (Grade) अवनत/कमी (Downgrade) करणे**

१२. नगरपरिषदेमध्ये पदोन्नतीसाठी शैक्षणिक व अनुभवाच्या अटी पूर्ण करत असलेला कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यास, त्या पदाचा दर्जा/श्रेणी तात्पुरत्या स्वरुपात त्याच संवर्गामध्ये एक श्रेणीने (Grade) अवनत/कमी (Downgrade) करता येईल. अवनत केलेले पद नवीन भरतीने भरत असताना शैक्षणिक पात्रता अनुभवाच्या अटीव्यतिरिक्त पूर्ण असणे आवश्यक आहे. अनुभवाची अट पूर्ण झाल्यानंतर हे पद उन्नत होईल. नवीन भरतीचे पद नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने स्थायी निदेश क्र.२०: क्र.नप्रसंई १००३/प्र.क्र.१५०/०३/७, दि.३१.१२.२००३ अन्वये नियुक्त केलेल्या पदोन्नती समितीच्या शिफारशींनुसार पद फक्त त्याच संवर्गामध्ये अवनत (Downgrade) करता येईल. एका संवर्गातील पद दुसऱ्या संवर्गामध्ये अवनत करता येणार नाही. तसेच वर्ग ३ चे पद वर्ग ४ मध्ये अवनत करता येणार नाही. अवनत केलेले पद नगरपरिषद आस्थापनेवर उपलब्ध असलेल्या कर्मचारी वर्गातून व शक्य नसल्यास नवीन भरतीने भरता येईल. पद अवनत (Downgrade) केल्यानंतर त्या पदावरील कार्यरत कर्मचाऱ्याची वेतनश्रेणी अवनत (Downgrade) पदाप्रमाणे असेल. पदोन्नतीसाठी शैक्षणिक व इतर अटी पूर्ण असलेला कर्मचारी वर्ग उपलब्ध झाल्यानंतर त्या पदाचा दर्जा/श्रेणी वाढवता/उन्नत (Upgrade) करता येईल.

**राज्यस्तरीय संवर्ग**

१३. नगरपरिषदेतील ज्या पदांचा राज्यस्तरीय संवर्ग शासनाकडून निर्माण होईल अशा संवर्गातील पदे कर्मचारी आराखडयामध्ये मंजूर असतील तर शासनाने विहीत केलेल्या सेवानियमानुसार शासन स्तरावर भरण्यात येतील व अशी पदे नगरपरिषदेला भरता येणार नाहीत. (संदर्भ: शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्र.एमसीओ १२०३/१२४६/सीआर-१६५०/०९/युडी-१४, दि. २.८.२००६)

**आस्थापना खर्चाची मर्यादा**

१४. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.संकीर्ण/१०९९/२९४/प्र.क्र.७८/२०००/नवि-२७, दि. २८ सप्टेंबर २००० अन्वये नगरपरिषद कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू करणे व रोजंदारी कर्मचाऱ्यांना रिक्त पदावर सामावून घेण्यासंदर्भात आस्थापना खर्चाची मर्यादा 'अ' वर्ग नगरपरिषदेसाठी ५०%, 'ब' वर्ग नगरपरिषदेसाठी ५५% व 'क' वर्ग नगरपरिषदेसाठी ६०% अशी विहित केलेली आहे. सर्व प्रकारच्या पदभरतीसाठी (वारसा पध्दत, अनुकंपा इ. अनुशेषांतर्गत येणाऱ्या पदांसह) आस्थापना खर्चाची मर्यादा बंधनकारक आहे.

१५. नगरपरिषद आस्थापनेची टक्केवारी या संचालनालयाच्या स्थायी निदेश क्र.२६ क्र. नपप्रसं २००५/आस्था खर्च/प्र.क्र.९१/२००५/का-२४, दि. ११.७.२००५ नुसार परिगणीत करण्यात यावी.

१६. नगरपरिषद आस्थापना खर्चाची कमाल टक्केवारी शासनाने विहित केलेल्या मर्यादेत असलेल्या प्रत्येक नगरपरिषदेने कमाल मर्यादेपर्यंत वर्षोनुवर्षे करावा असे अपेक्षित नाही. जरी नगरपरिषदेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी शासनाने विहित केलेल्या मर्यादेच्या आत असली तरी शासन निर्णय वित्त विभाग दि. १०.९.२००१ मधील परिच्छेद १.३-अ मध्ये शासनाने सूचित केल्याप्रमाणे आस्थापनेवरील खर्चात मागील वर्षाच्या तुलनेत कमीत कमी दीड टक्के बचत करणे आवश्यक आहे. म्हणून आस्थापना खर्चाची इष्टतम मर्यादा (Optimum Limits) खालीलप्रमाणे अभिप्रेत आहे.

ज्यावेळी नगरपरिषदेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी वरिल इष्टतम मर्यादेपर्यंत (Optimum Limits) येईल तोपर्यत अशी बचत करण्यांत यावी.

| अ.क्र. | नगरपरिषदेचा वर्ग | आस्थापना खर्चाची विहित कमाल मर्यादा | आस्थापना खर्चाची इष्टतम मर्यादा(Optimum Limits) |
|---|---|---|---|
| १ | अ | ५०% | ३०% |
| २ | ब | ५५% | ३५% |
| ३ | क | ६०% | ४०% |

**रोजंदारी कर्मचा-यांसाठी पद रिक्त ठेवणे**

१७. नगरपरिषद आस्थापनेवर दि. १०.३.९३ पूर्वीचे रोजंदारी कर्मचारी अद्याप सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने कायम केले नसतील तर त्यांच्यासाठी नगरपरिषदेच्या आस्थापनेवर पद रिक्त असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यांना दि.१०.३.१९९३ ते दि.२७.३.२००० या कालावधीतील रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन स्तरावर विचाराधीन आहे. या कालावधीतील रोजंदारी कर्मचारी कार्यरत असतील तर त्यांच्यासाठी नगरपरिषदेच्या आस्थापनेवर पद रिक्त असणे आवश्यक आहे.

१८. दि. २८.३.२००० नंतर नगरपरिषदेने रोजंदारी कर्मचारी लावले असतील तर त्यांना विहित पध्दतीने कमी करण्यांबाबत या संचालनालयाचे क्र.नप्रसई १००३/प्र.क्र.३६८/०३/५ दि. ३.१.२००४ अन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. ज्यांच्या बाबतीत न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित असेल तर त्यांच्यासाठी नगरपरिषदेच्या आस्थापनेवर पद रिक्त असणे आवश्यक आहे.

**पदभरतीकरिता प्राधान्यक्रम**

१९. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील रिक्त होणारी पदे खाली नमूद केलेल्या प्राधान्यक्रमानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन भरता येतील.

**अ) अंतर्गत भरती**

१) नगरपरिषदेच्या कायम आस्थापनेवरील कर्मचारी अतिरिक्त ठरले असतील (जकात/दुकान अधिनियम/दवाखाना इ.) अशा कर्मचाऱ्यांना व अस्थायी पदावर नियमित केलेले रोजंदारी कर्मचाऱ्यांना स्थायी पदावर वर्ग करणे

२) पदोन्नतीने.

३) कर्मचाऱ्यांमधून अंतर्गत भरती.

**ब) नवीन भरती**

१) लाड कमिटीच्या शिफारशीनुसार

२) अनुकंपा तत्वाखालील नियुक्ती

३) शासनाच्या अतिरिक्त कक्षातून.

४) सरळसेवेने.

**नगरपरिषदेच्या कायम आस्थापनेवरील अतिरिक्त ठरलेले कर्मचारी**

२०. शासनाद्वारे वेळोवेळी काढलेल्या आदेशामुळे खालील कर्मचारी वर्गाची नगरपरिषदेमध्ये आता आवश्यकता नाही.

अ) शासनाने १.४.१९९९ पासून राज्यातील नगरपरिषदांमधील जकात बंद केल्यामुळे जकात विभागातील अतिरिक्त ठरलेले कर्मचारी नगरपरिषदेच्या रिक्त पदावर सामावून घ्यावयाचे आहेत.

ब) शासन अधिसूचना क्र.बीएसई १०९७/ ५३४५६/(६५१९)/काम-९,दि. १५.७.२००२ अन्वये मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ च्या अंमलबजावणीचे कामकाज शासनाकडे घेण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि या कामासाठी असलेला नगरपरिषदेचा कर्मचारी वर्ग घेतलेला नाही. त्यामुळे या पदावरील कर्मचारी अतिरिक्त ठरले आहेत. या विभागातील अतिरिक्त ठरलेले कर्मचारी नगरपरिषदेच्या रिक्त पदावर सामावून घ्यावयाचे आहेत.

क) नगरपरिषदेचे दवाखाने रुग्णालये शासनाने ताब्यात घेणेबाबत सार्वजनिक आरोग्य विभाग निर्णय क्र. डीएसपी १०८५/१५२७/आरोग्य-३, दि. १९.३.१९८६ अन्वये धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या विभागातील नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील मंजूर पदे रिक्त झाल्यानंतर भरता येत नाही. तसेच काही ठिकाणी नगरपरिषदेने दवाखाने शासनास हस्तांतरीत केलेले असले तरी नगरपरिषदेचे कर्मचारी शासनाने हस्तांतरीत करुन घेतलेले नाहीत असे नगरपरिषदेचे दवाखाना विभागातील कर्मचारी अतिरिक्त ठरले असून त्यांना नगरपरिषदेच्या इतर विभागात रिक्त पदांवर सामावून घेणे आवश्यक आहे.

ड) शासन नगर विकास विभाग पत्र क्र.जीईएन १०९३/७९४/प्र.क्र.६६/नवि-१४, दि.१७.४.१९९३ अन्वये बालवाडी विभागातील बालवाडी शिक्षिका व बालवाडी सेविका इ. तत्सम पदे निर्माण करण्यावर बंदी घातली आहे. यापूर्वी बालवाडी विभागात निर्माण करण्यांत आलेली पदे यापुढे भरता येणार नाहीत.

इ) नगरपरिषदेच्या आस्थापनेवर दि. १०.३.९३ पूर्वीच्या रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाने कायम करण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार नगरपरिषदेच्या आस्थापनेवर तात्पुरती अस्थायी पदे निर्माण करुन नियमित करण्यांत आलेली आहेत. या नियमित केलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांकडे विहित शैक्षणिक पात्रता असेल तर सेवाजेष्ठतेनुसार या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.२० क्र.नप्रसंई १००३/प्र.क्र.१५०/०३/७ दि. ३१.१२.२००३ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील स्थायी पदांवर वर्ग करण्यात यावे.

फ) नगरपरिषदेच्या सुधारीत आकृतिबंधाच्या आदेशामध्ये मंजूर केलेल्या अस्थायी पदावरील कर्मचाऱ्यांना स्थायी पदावर वर्ग करणे आवश्यक आहे.

२१. वरील जकात, दवाखाना, दुकान आस्थापना,अतिरिक्त ठरलेल्या व अस्थाई पदावर नियमित केलेले रोजंदारी कर्मचारी इत्यादी वर्ग ३ मधील कर्मचा-यांना अन्य विभागात वर्ग ३ मधील समतुल्य पदाच्या शैक्षणिक अर्हतेची पूर्तता सदरचे कर्मचारी करत असतील तर अशा तांत्रिक व अतांत्रिक पदावर प्राधान्याने सामावून घेण्यांत यावे.

२२. वरील जकात, दवाखाना, दुकान आस्थापनाअतिरिक्त ठरलेल्या व अस्थाई पदावर नियमित केलेले रोजंदारी कर्मचारी इत्यादी वर्ग -४ मधील शिपाई, वॉचमन पदावरील कर्मचा-यांना अन्य विभागात वर्ग-४ मधील शिपाई/ व्हॉलमन इ.तत्सम पदावर प्राधान्याने सामावून घ्यावे, तथापी सफाई कामगार या पदावर सामावून घेण्यात येऊ नये.

२३. नगरपरिषदेच्या कायम आस्थापनेवर अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांची पदे ही व्यपगत होतील. त्या पदांवर नगरपरिषदेला भरती करता येणार नाही.

**पदोन्नतीने पद भरण्याची कार्यवाही**

२४. अतिरिक्त कर्मचा-यांना सामावून घेतल्यानंतर रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यांत यावीत.

२५. पदोन्नतीने पद भरतेवेळी या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र. २० क्र.नप्रसंई १००३/ प्र.क्र.१५०/०३/७ दि. ३१.१२.२००३ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यांत यावा.

२६. चतुर्थश्रेणीतील अस्वच्छता काम करणाऱ्या कामगारांनी वर्ग-३ किंवा इतर तांत्रिक कामास योग्य अशी शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांना प्राधान्याने पदोन्नती देण्यांत यावी. (संदर्भ : शासन नगर विकास विभाग परिपत्रक क्र.जीईएन १०८९/१३७९/सीआर १९३/नवि-१४ दि. ९ ऑक्टोबर १९८९ )

२७. नगरपरिषदेच्या आस्थापनेवर सरळसेवेने अथवा पदोन्नतीने पद भरती करतांना नगरपरिषदेने पदाच्या विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हतेचे काटेकोरपणे पालन करावे. विहित शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत नसलेल्या अपात्र उमेदवाराची पदोन्नतीने नियुक्ती करुन शैक्षणिक अर्हता शिथिल करण्याबाबतचे प्रस्ताव या संचालनालयाकडून विचारात घेतले जाणार नाहीत. त्यामुळे असे प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यांत येऊ नयेत. अपात्र कर्मचाऱ्यास पदोन्नतीने नियुक्त केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषद मुख्याधिकारी यांचेवर राहील, व अशा प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन बेकायदेशीर नियुक्तीच्या वेतनावर झालेला खर्च वसूलीस पात्र राहील.

२८. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील पदे पदोन्नतीने भरतेवेळी या स्थायी निदेशातील परिच्छेद क्र. ७२ ते ९० मध्ये नमूद केलेल्या मागासवर्गीय तसेच समांतर आरक्षणाबाबतच्या तरतुदीचे तसेच अपंगाबाबतचे निर्देशाचे व शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेले आदेशाचे पालन करावे.

**अंतर्गत भरती बाबतची कार्यवाही**

२९. अतिरिक्त कर्मचाऱ्यांतून/पदोन्नतीने रिक्त पदे भरल्यानंतर उर्वरित स्थायी रिक्त पदे अंतर्गत भरती पध्दतीने भरण्यांत यावीत. नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी कमी आहे. नगरपरिषदेने रिक्त पद फक्त सरळसेवेने जिल्हा निवड समिती मार्फत भरल्यास शैक्षणिक अर्हता असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी मिळत नाही. सरळसेवेने भरण्याअगोदर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना स्पर्धात्मक संधी देऊन नगरपरिषदेच्या पदावर नियुक्तीची संधी दिल्यास कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळणार आहे. या कारणास्तव अंतर्गत भरती पध्दत यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

३०. रिक्त पदाचा तपशिल (शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेणी इ.) नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करुन नगरपरिषदेमध्ये कार्यरत असलेल्या इच्छुक कायम तसेच जे दि.१०.३.९३ पूर्वीचे रोजंदारीवर कर्मचारी नगरपरिषदेच्या सेवेत नियमित करण्यांत आलेले आहेत त्या कर्मचाऱ्यांकडून आवेदन पत्र मागवावे.

३१. प्राप्त झालेल्या आवेदन पत्राची छाननी या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.२०, क्र.नप्रसंई १००३/प्र.क्र.१५०/०३/७, दि. ३१.१२.२००३ मध्ये नमूद केलेल्या समिती मार्फत करण्यांत यावी.

३२. जर नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील पदाची तांत्रिक पात्रता नगरपरिषदेमधील कार्यरत कर्मचारी पूर्तता करत नसतील परंतु आवश्यक असलेली मूळ शैक्षणिक पात्रता ते धारण करत असतील (उदा. पंपचालक या पदाची किमान मूळ शैक्षणिक अर्हता माध्यमिक शालांत परिक्षा उतीर्ण अशी आहे. तांत्रिक अर्हता ही शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा वीजतंत्री विषयाचे प्रशिक्षण पूर्ण अशी आहे.) अतिरिक्त कर्मचाऱ्यांकडे रिक्त पदाची तांत्रिक पात्रता नसेल परंतु मूळ शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेने त्यांच्याकडून विकल्प घेऊन त्यांना प्रशिक्षणासाठी (उदा. फायरमन, लिडिंग फायरमन, पंप ऑपरेटर, फिटर इ.तत्सम पदे) पाठवावे व कर्मचाऱ्याने तांत्रिक अर्हता प्राप्त केल्यानंतर रिक्त पदावर समावेशन करण्यांत यावे.

३३. कर्मचाऱ्यांनी जर पदावर काम करण्याचा विकल्प दिला तर त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवितांना प्रशिक्षणावरील खर्च नगरपरिषदेमार्फत करण्याचे आर्थिक परिस्थितीचा विचार करुन नगरपरिषदेने निर्णय घ्यावा. तसेच प्रशिक्षण कालावधीमधील अनुपस्थिती ही पूर्ण पगारी रजा म्हणून गणना करण्यांत यावी.

३४. विहित अर्हता प्राप्त असलेल्या उमेदवाराची संख्या ५ पेक्षा कमी असेल तर निवड समितीने मुलाखतीद्वारे गुणवत्तेनुसार उमेदवाराची निवड करावी. मुलाखतीपूर्वी निवड समितीस आवश्यकता वाटल्यास स्पर्धा परिक्षेचे आयोजन करण्यास हरकत नाही. अर्हताप्राप्त उमेदवारांची संख्या ५ पेक्षा जास्त असल्यास स्पर्धा परिक्षा व मुलाखतीद्वारे उमेदवाराची निवड करावी. स्पर्धा परिक्षेचे स्वरुप, मुलाखतीचे निकष व गुण जिल्हा निवड समितीने निश्चित करावे. वरीलप्रमाणे निवड करतांना कर्मचाऱ्याचे वय किती असावे याबाबत निर्णय घेणेत यावा. याबाबत निर्णय घेण्यास जिल्हा निवड समिती सक्षम राहील.

**नवीन भरतीबाबतची कार्यवाही**

३५. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील रिक्त पदे अंतर्गत भरतीने भरता येत नाहीत याची खात्री झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे नवीन भरतीने रिक्त पद नगरपरिषदेस भरता येईल.

३६. राज्यातील सर्व नगरपरिषदांतील अनुकंपा तत्वावरील पदे व सफाई कामगारांची पदे वित्त विभागातील अतिरिक्त संवर्ग कक्षातून भरण्याची अट वगळण्यांत आली आहे. (संदर्भ शासन नगर विकास विभाग पत्र क्र.मागास २२२००२/५१०/प्र.क्र.५३/२००२/नवि-६, दि. २७.सप्टेंबर, २००२)

**लाड कमिटीच्या शिफारशीनुसार (वारसा पध्दत)**

३७. लाड कमिटीच्या शिफारशीनुसार (वारसा पध्दत) पदे भरण्याबाबतच्या अडचणी विचारात घेऊन सफाई कामगारांना स्थायी निदेश क्र.२३ मधून वगळणेत आले आहे.

३८. लाड कमिटीच्या शिफारशीनुसार नियुक्ती करतांना या कार्यालयाचे परिपत्रक क्र.नप्रसं/२००५/लाड कमिटी/प्र.क्र. ११५/५ दिनांक २३.९.२००५ व परिपत्रक क्र. लाड कमिटी/प्र.क्र.११५(५)/२६, दि. २३ मार्च, २००६ मधील तरतुदीचे पालन लाड कमिटीच्या शिफारशीनुसार नियुक्ती करतांना करण्यांत यावे.

३९. नगरपरिषदेमध्ये सफाई कामगारांच्या वारसांना वारसा पध्दतीने नियुक्ती तात्काळ मिळावी म्हणून वारसा हक्काने नियुक्ती द्यावयाची असेल त्यावेळी स्थायी निदेश क्र.२६, मध्ये आस्थापना खर्च परिगणना करताना परिशिष्ट ब च्या २ (ब) मध्ये नमूद केलेल्या बाबी (अदा न झालेला पाणी पुरवठयामधील खर्चाच्या रकमा) घेण्यांत येऊ नये अशी विशेष बाब म्हणून सुट देण्यांत आली आहे.

४०. नगरपरिषद आस्थापनेची टक्केवारी शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. संकीर्ण १०९९/२१४/प्र.क्र.७८/२०००/नवि-२७, दि. २८.१०.२००० अन्वये विहित केलेल्या मर्यादेच्या आत असावी. जर आस्थापना खर्चाची टक्केवारी स्थायी निदेश क्र.२६ मध्ये विहित केल्याप्रमाणे परिगणना केल्यानंतर विहित मर्यादेपेक्षा जास्त असल्यास वारसा हक्काने मा.संचालकांच्या पूर्व परवानगीशिवाय नेमणूक करता येणार नाही.

४१. नगरपरिषदांमध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांच्या नेमणूकीसाठी आकृतिबंध मंजूर असणे आवश्यक आहे. ज्या नगरपरिषदेचा सुधारीत आकृतिबंध मंजूर केलेला नसल्यास व संचालकांकडे सुधारीत आकृतिबंध सादर केलेला असल्यास व या आकृतिबंधास ३० दिवसांत मंजूरी मिळालेली नाही किंवा याबाबत त्रूटी कळविलेल्या नसल्यास मा.संचालकांची मंजूर घेऊन वारसा हक्काची नेमणूक करता येईल.

४२. नगरपरिषदेच्या मंजूर आकृतिबंधातील अस्थायी पदे, त्या पदावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास किंवा अन्य कारणाने पद रिक्त झाल्यास अस्थाई पद निष्कासित होणार आहेत. याशिवाय जेष्ठतेनुसार अस्थायी पदावरील कर्मचारी रिक्त स्थायी पदावर वर्ग झाल्यास अस्थायी पदे रिक्त होणार आहेत. मात्र लाड कमिटीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांचे वारस विहित अटींचे पालन करीत असल्यास त्यांना नियुक्ती देण्यासाठी स्थायी पद रिक्त नसेल तर त्यांना व्यपगत होणाऱ्या अस्थायी पदावर नियुक्ती दयावी अगर कसे याबाबतचा निर्णय घेण्यास नगरपरिषद सर्वसाधारण सभा सक्षम राहील.

४३. लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसापध्दतीबाबत शासनाकडून व या संचालनालयाकडून वेळोवेळी काही आदेश /खुलासे करण्यांत आले आहेत. त्यातील महत्वाच्या आदेश /खुलासे खालीलप्रमाणे कार्यवाहीसाठी प्रस्तूत करण्यांत येत आहेत.

अ. लाड कमिटीच्या शिफारशी हया सफाई कामगारांच्या स्वीपर्स किंवा स्कॅव्हेंजर्स या पदांवरील कर्मचाऱ्यांसाठी मर्यादित आहे. इतर चतुर्थश्रेणीतील पदे उदा.शिपाई, रखवालदार, मजूर, माळी इ. तत्सम पदे यांना लागू नाही. (संदर्भः या संचालनालयाचे आदेश क्र: डब्ल्युपी/२००१ /प्र.क्र.४/२००१/४/५, दि.२२ जानेवारी २००४) त्याचप्रमाणे लाड कमिटीच्या शिफारशी हया सफाई कामगारांच्या समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी केलेल्या आहेत. त्यामुळे सफाई कामगारांच्या कामाव्यतिरिक्त इतर पदांची कामे जर सफाई कामगार करीत असेल तर त्यांना सदरच्या शिफारशी लागू नाहीत.

ब. सफाई कामगाराची २० वर्षे सेवा झाल्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सकाच्या प्रमाणपत्राच्या आधारे वैद्यकीय कारणास्तव सेवेत अपात्र ठरविल्यास त्यांच्या वारसदारास कामावर घेता येईल. (संदर्भः शासन नगर विकास विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण २२९२/१९९९/प्र.क्र.१६४/९२/नवि-६ दि. १२ जानेवारी १९९४)

क. सफाई कामगार जर पदोन्नती मिळून ते तृतीय श्रेणीत गेले तर त्यांच्या वारसांना लाड कमिटीची शिफारस लागू होणार नाही. (संदर्भः शासन नगर विकास विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण २२९२/१९९९/प्र.क्र.१६४/९२/नवि-६ दिनांक ५ नोव्हेंबर १९९२)

ड. सफाई कामगार नोकरी करीत असतांना त्यांना चतुर्थश्रेणीतच पदोन्नती मिळाल्यास वारस हक्काचे निर्यमास बाधा येणार नाही. (संदर्भः नगर विकास विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण-२२९२/१९९९/प्र.क्र.१६४/९२/नवि-६, दि. ३०.६.१९९४)

इ. लाड कमिटीच्या शिफारशीनुसार सफाई कामगाराच्या पदावर उमेदवाराची नियुक्ती करतांना किमान चौथी इयत्ता उत्तीर्ण या शैक्षणिक अर्हतेच्या पूर्ततेचे काटेकोरपणे अवलंब करण्याची आवश्यकता नाही. (संदर्भः शासन साप्रवि निर्णय क्र.आरटीआर-१०८३/१२, दि. २३.३.१९८३ )

फ. लाड कमिटीनुसार नियुक्ती दयावयाच्या उमेदवाराची सेवायोजन कार्यालयाकडून शिफारस आवश्यक नाही. मात्र उमेदवारांनी आपले नाव स्थानिक सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदविणे आवश्यक आहे. त्याची

छाननी जिल्हाधिकारी यांनी करणे आवश्यक आहे. (संदर्भः शासन नगर विकास विभाग परिपत्रक क्र.संकीर्ण २२९२/१९९९/प्र.क्र.१६४/९२/नवि-६, दि. ५ नोव्हेंबर १९९२)

ग. लाड कमिटीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, उद्योग उर्जा व कामगार विभाग व नगर विकास विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/परिपत्रकांमध्ये नियुक्तीसाठी अर्ज सादर करतेवेळी वारसाच्या वयाच्या अटीबाबत उल्लेख नाही. त्यामुळे सध्या शासन सेवेत मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत विहित केलेली १८ ते ३८ ही वयोमर्यादेच्या अटीची पात्रता वारस पध्दतीने नियुक्ती देतांना जिल्हाधिकारी यांनी कटाक्षाने पाळावी.

ह. लाड कमिटीच्या शिफारशी वारसा (वशिला) पध्दतीची अंमलबजावणीबाबत या संचालनालयाने परिपत्रक क्र.नप्रसं/२००५/लाड कमिटी/प्र.क्र.११५(५)/२६, दि. २३.३.२००६ मध्ये नगरपरिषदांना मुद्देनिहाय मार्गदर्शनपर केलेले स्पष्टीकरण विचारात घेण्यांत यावे.

अनुकंपा पध्दत

४४. शासन नगरविकास विभाग निर्णय क्र.एमसीओ १२९६/१८८९/प्र.क्र. ११५/९६/नवि १४, दि. १६ ऑक्टोंबर ११९७ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेली अनुकंपा तत्वाखाली नेमणूक देण्याबाबतची योजना त्यातील अटींसह व त्यामध्ये वेळोवेळी करण्यांत येणाऱ्या बदलासह योजनेमध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून राज्यातील नगरपरिषदांतील कर्मचाऱ्यांना आदेशाच्या दि.१६ ऑक्टोंबर, १९९७ पासून लागू करण्यांत आली आहे.

४५. अनुकंपा तत्वाखालील योजना ही सर्व नगरपरिषदेच्या स्थाई कर्मचाऱ्यांना लागू आहे. ही योजना अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी (जकात ,दुकाने, दवाखाने इ. विभागातील) सुध्दा लागू आहे.

४६. यापूर्वी शासन सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा/१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दि. २६ आक्टोबर, १९९४ अनुकंपा तत्वाखालील योजना लागू होती आता शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. अकंपा १००४/प्र.क्र.५१/२००४/८, दि. २२.८.२००५ अन्वये अनुकंपा तत्वाखाली नियुक्ती देण्याबाबतचे सुधारीत आदेश निर्गमित केलेले आहेत.

४७. गट "क" व "ड" मधील कर्मचारी कर्करोग, पक्षाघात यामुळे सेवेसाठी कायमचा असमर्थ ठरुन रुग्णता निवृत्त झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना गट "क" व "ड" मधील पदांवर नियुक्ती देण्याची सवलत रद्द करण्यांत आली आहे. यापुढे केवळ सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट "क" व "ड" च्या कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांनाच अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय आहे. (संदर्भः-शासन सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा१००४/प्र.क्र.५१/२००४/८, दि. २२.८.२००५)

४८. अनुकंपा तत्वाखालील नियम हे खालील कर्मचाऱ्यांसाठी लागू नाहीत.

अ. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ६६८१/२००० मध्ये दिलेल्या निर्णयानुसार वर्ग-४ चे (सफाई कामगार वगळून) सेवानिवृत्त कर्मचा-याचे वारसाना अनुकंपा तत्वावर नेमता येणार नाही. (संदर्भ : या कार्यालयाचे आदेश क्र. डब्लुपी /२००१/प्र.क्र.४/२००१/४/५ दि.२२/१/२००४)

ब. रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ अनुज्ञेय नाही. शासनाने दिनांक १०.३.९३ पूर्वीच्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना विशिष्ट परिस्थितीत एकवेळची विशेष बाब म्हणून नियमित सेवेत (अस्थायी आस्थापनेवर) सामावून घेण्यास मान्यता दिली आहे, त्यामुळे अस्थायी आस्थापनेवर घेण्यांत आलेल्या वरील कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ अनुज्ञेय नाही. (संदर्भः या कार्यालयाचे पत्र क्र. नप्रसंई - १००४/प्र.क्र.१४/स०४/५, दि. १६ फेब्रुवारी, २००४ )

क. ज्या नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या प्रथम नियुक्त्या हया नियमानुसार विहित पध्दतीने करण्यांत आलेल्या नाहीत, त्या नियमबाहय नियुक्त्या नियमानुकुल करण्यास मान्यता देण्यांत आली आहे, व जरी ते कर्मचारी स्थायी पदावर कार्यरत असतील तरी त्या नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या वारसांना वरीलप्रमाणे अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा लाभ अनुज्ञेय नाही.

ड. बेपत्ता कर्मचाऱ्यांच्या वारसाला अनुकंपा तत्वावर लाभ अनुज्ञेय नाही. (संदर्भः शासन सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा १००४/प्र.क्र.५१/२००४/८ दि. २६.१०.१९९४ व क्र. अकंपा १००४/प्र.क्र.५१/२००४/८ दि. २२.८.२००५)

४९. अनुकंपा तत्वावरील गट "क" व "ड" मधील पदावर नियुक्तीसाठी सक्षम नियुक्ती प्राधिकारी कार्यालय प्रमुख राहील. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. अकंपा १००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दि.२२ ऑगष्ट २००५)

५०. खालील पात्र कुटुंबियानाच अनुकंपा तत्वाखाली नेमणूक करता येईल. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा १००४/प्र.क्र.५१/२००४/८, दि. २६.१०.१९९४)

अ. पती / पत्नी

ब. मुलगा

क. अविवाहित मुलगी

ड. मृत्यूपुर्वी कायदेशीर रीत्या दत्तक घेतलेला मुलगा

इ. मृत्यूपुर्वी कायदेशीर रीत्या दत्तक घेतलेली अविवाहित मुलगी

५१. अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटुंबियाकडून संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्याची सध्याची ५ वर्षाची मुदत कमी करुन कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या मुदतीत अर्ज करणे आवश्यक राहील. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा १००४/प्र.क्र.५१/२००४/८, दि. २२.८.२००५)

५२. अनुकंपा पदासाठी गट क व ड मधील नियुक्तिसाठी उमेदवाराच्या प्रतिक्षा सूची ठेवण्याची पध्दत खालीलप्रमाणे विहीत केली आहे. (संदर्भ:- शासन सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा १००४/प्र.क्र.५१/२००४/८, दि. २२.८.२००५)

अ) नगरपरिषदेने गट `क` व गट `ड` मधील पदावर अनुकंपा तत्वाखाली नियुक्तीसाठी सामायिक प्रतिक्षासूची ठेवावी.

ब) अनुकंपाखाली प्रतीक्षासुचीतील वारसाची जेष्ठतेचा दिनांक निश्चित करतांना ज्या दिवशी अर्ज प्राप्त झालेला आहे तो दिनांक जेष्ठतेसाठी ग्राहय धरण्यांत यावा.

क) मुख्याधिकारी यांनी अनुकंपा तत्वाखाली आलेल्या अर्जाची छाननी करुन विहित अटी व शर्ती यांची पूर्तता करणारी प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्याकडे पडताळणीसाठी पाठवावीत.

ड) जिल्हाधिकारी यांनी अनुकंपा योजनेखाली वेळोवेळी झालेल्या सुधारणा विचारात घेऊन अनुकंपा प्रकरणांची पडताळणी करावी व संबंधित उमेदवाराचे नांव प्रतिक्षासूचीत समाविष्ट करण्याबाबत नगरपरिषदेला कळवावे.

इ) जिल्हाधिकारी यांची संमती प्राप्त झाल्यानंतर उमेदवाराचे नांव नगरपरिषदेच्या प्रतिक्षासूचीवर घेण्यांत यावे व ही प्रतिक्षासूची नगरपरिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यांत यावी.

फ) नगरपरिषदा उपलब्ध गट `क` व गट `ड` च्या रिक्त पदावर प्रतिक्षासूचीतील क्रमानुसार उमेदवाराची नियुक्ती करु शकतील.

५३. अनुंकपा नियुक्तीसाठी गट क आणि गट ड साठी रिक्त होणा-या पदांपैकी ५% पदांची मर्यादा विहित केली आहे. (संदर्भ:-शासन सामान्य प्रशासन निर्णय क्र.अकंपा१००४/प्र.क्र.५१/२००४ /आठ, दि. २२.८.२००५ ) ही ५% पदे भरतांना मागासवर्गीय किंवा अमागासवर्गीय असा भेदाभेद न करता भरता येतील.

५४. अनुंकपा नियुक्तीसाठी गट क आणि गट ड साठी रिक्त होणा-या पदांची १०० बिंदू नोंदवही ठेवावी. त्यातील १ ला बिंदू जर अनुकंपा तत्वाखाली भरण्यांत आला तर त्यानंतर २१ वा बिंदू अनुकंपा तत्वाखाली भरण्यांत यावा. दरम्यानची उर्वरीत रिक्त पदे ही सरळसेवेने भरण्यात यावीत.

५५. वयाच्या ४० वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षासूचीत नव्याने समाविष्ट होणाऱ्या उमेदवारांना वयाच्या ४० वर्षापर्यत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४० वर्ष पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेवून सूचीतून काढून टाकण्यात यावीत. (संदर्भ:- शासन सामान्य प्रशासन विभाग क्र.अकंपा १००४/प्र.क्र.५१/२००४/८, दि २२.८.२००५)

५६. मुख्याधिकारी नगरपरिषद यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या अर्जाची शासन निर्णयानुसार छाननी करुन फक्त पात्र उमेदवारांनाच नियुक्ती करावयाची आहे. अनुकंपा तत्वाखालील नियमामध्ये शिथिल करण्याचे अधिकार शासनास नाहीत त्यामुळे नियमात न बसणारे प्रकरण जिल्हाधिकारी/संचालनालयास/शासनास पाठविण्यांत येऊ नयेत. (संदर्भ:-शासन सामान्य प्रशासन परिपत्रक क्र.अकंपा१००३/प्र.क्र.५१/२००३/आठ, दि. २९.१०.२००३)

५७. अनुकंपा तत्वावरील नेमणुकीची अंमलबजावणीबाबत या संचालनालयाने परिपत्रक क्र.नपपसं/अनुकंपा-मार्गदर्शन/२००६/प्र.क्र.१४६/२६, दि. १७ मार्च २००६ मध्ये नगरपरिषदांना मुद्येनिहाय मार्गदर्शनपर केलेले स्पष्टीकरण विचारात घेण्यांत यावे.

शासनाचे अतिरिक्त कक्षातून

५८. नगरपरिषदेतील रिक्त पदे अतिरिक्त कर्मचाऱ्यांतून / पदोन्नतीने / अंतर्गत भरतीतून / लाड कमिटीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांची /अनुकंपा तत्वानुसार (५%)पदे भरल्यानंतर उर्वरित रिक्त पदे वित्त विभागाच्या अतिरिक्त कक्षातून खालीलप्रमाणे भरण्यांत यावीत.

५९. शासन वित्त विभाग निर्णय क्र. असंक/१००१/प्र.क्र.२९/भाग-६/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि. १.७.२००४ नुसार रिक्त पदांपैकी कमीतकमी २०% एवढी रिक्त पदे शासनाच्या अतिरिक्त कक्षाकडे आवश्यक ते कर्मचारी/ अधिकारी यांची मागणी करुन भरण्यांत यावीत.

सरळसेवेच्या नियुक्ती

६०. अतिरिक्त कर्मचाऱ्यांतून/पदोन्नतीने/अंतर्गत भरती प्रध्दतीतून/लाड कमिटीच्या शिफारशीनुसार/अनुकंपा तत्वावरील / शासनाच्या अतिरिक्त कक्षातून पदे भरल्यानंतर शिल्लक रिक्त पदे सरळसेवेने भरण्यांत यावीत.

६१. नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील रिक्त पदे शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्य पध्दतीनुसार वर्ग-३ ची रिक्त पदे जिल्हा निवड समितीमार्फत शिफारस केलेल्या पात्र उमेदवारामधून भरावयाची आहेत. वर्ग-४ ची रिक्त पदे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, यांच्याकडून शिफारस केलेल्या पात्र उमेदवारांमधून नगरपरिषदेने निवड करुन भरावयाची आहेत.

६२. रिक्त पदे भरतांना रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून (सेवायोजन कार्यालये) ज्येष्ठतेनुसार यादी प्राप्त करुन घेण्यात यावी. त्याचबरोबर वर्ग-३ची व वर्ग-४ ची रिक्त पदांबाबतची जाहिरात सर्व प्रसार माध्यमांतून (वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे, दुरदर्शन, रेडिओ, नोटीस बोर्ड इ.) प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात यावेत व वरील दोन्ही प्रकारे प्राप्त होणाऱ्या याद्यांमधून / अर्जामधून पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्यात यावी. (शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक: संकिर्ण-१००३ /प्र. क्र. ९६ /२००३/१३-अ, दि. १९ .११.२००३)

६३. गट क ची रिक्त पदे सरळसेवेने भरतांना ७५% लेखी अथवा किमान शैक्षणिक पात्रतेच्या इयत्तेत/परिक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणांसाठी व २५% तोंडी गुणांद्वारे भरतीची प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. (शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.प्रनिमं ३००४/प्र.क्र.३२/२००४/१३-अ, दि. ९ जून, २००४ )

६४. गट ड पदावरील सरळसेवेने नियुक्त्या करतांना ७५% लेखी अथवा किमान शैक्षणिक पात्रतेच्या इयत्तेत/परिक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणांद्वारे व २५% तोंडी गुणांद्वारे भरतीची प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. (शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१२/०४/बारा, दि. ७ जून, २००४)

६५. गट क मधील (वाहनचालक वगळून) सरळसेवेने नियुक्त केलेल्या व्यक्तीकडे, शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी/वापराबाबतचे आवश्यक ज्ञान असलेले प्रमाणपत्र बंधनकारक आहे. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन अधिसूचना क्र.सेप्रनि १०९८/प्र.क्र.७/९८/९२, दि.२५ जानेवारी, १९९१)

६६. सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागू केली आहे. (शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही २०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि. १ जुलै, २००५) नियुक्ती प्राधिका-याने विहित केलेल्या नमुन्यामध्ये लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र संबंधित उमेदवारांकडून घेण्यांत यावे.

रोजंदारी / हंगामी / मानधन / कंत्राटी व प्रतिनियुक्तीवरील नियुक्त्या

६७. हंगामी व रोजंदारीवर नियुक्ती करण्यांत येऊ नये असे शासनाचे धोरण आहे. नगरपरिषदेने त्यांच्या आस्थापनेवरील पदनिर्मितीच्या सुधारीत आकृतीबंधास या संचालनालयाने मान्यता दिल्यानंतर नगरपरिषदेस जिल्हाधिकारी किंवा विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांच्या मान्यतेने नगरपरिषदेच्या आस्थापनेवर इतर कोणतेही पद तात्पुरते / हंगामी / अंशकालीन/रोजंदारीवर मंजूर करता येणार नाही.

६८. स्थानिक परिस्थितीनुसार हंगामी कामे उदा.पावसाळ्यापूर्वीची साफसफाई, यात्राकाळातील साफसफाई व आपत्कालीन परिस्थितीतील कामे, हंगामी स्वरुपाची कामे ज्या विभागामध्ये केली जातात ती कामे यापुढे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ४९ (अ) अन्वये अभिकर्त्यामार्फत (Agency) कंत्राटी पध्दतीवर करुन घेण्यांत यावी. कंत्राटीने कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या नगरपरिषदेने करु नयेत. (संदर्भ: शासन वित्त विभाग निर्णय क्र. असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा दि. १०.९.२००१)

६९. या संचालनालयाचे स्थायी निदेश क्र.३६ क्र.नप्रसं/निविदा मागविणे/०५/प्र.क्र.१५१/०५/९, दि. २९.१२.२००५ अन्वये अभिकर्ता नेमण्यासाठी निविदा मागविणे व संविदा करणे याबाबतच्या सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना देण्यांत आलेल्या आहेत. त्याचे काटेकोरपणे पालन करणे नगरपरिषदेवर बंधनकारक आहे.

७०. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ५८(२) (क) (१)नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील वर्ग-३, वर्ग-४ च्या त्याचप्रमाणे रोजंदारी, मानधनावरील, कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्याचे अधिकार नगरपरिषद अध्यक्षांना नाहीत. त्यामुळे रोजंदारीवर मानधनावर किंवा नियमित पदावर अध्यक्ष नियुक्ती देऊ शकत नाहीत व अशा नियुक्त्या अध्यक्षांना करता येणार नाहीत. तथापि अशा स्वरुपाच्या अध्यक्षांनी नियुक्ती केल्यास मुख्याधिकाऱ्यांनी तात्काळ ही बाब महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ५५ अन्वये कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास आणावी व अशा नियमबाहय नियुक्त्या केलेल्या कर्मचाऱ्यांचे मुख्याधिकारी यांनी वेतन अदा करु नये.

७१. नगरपरिषदेच्या आस्थापनेवर जर पद मंजूर नसेल तर प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्याची नियुक्ती नगरपरिषदेस करता येणार नाही. फक्त मंजूर रिक्त पदावर जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेने प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल.

**पदांच्या आरक्षणाबाबत**

७२. नगरपरिषद आस्थापना पदभरतीमधील पदांच्या आरक्षणाबाबत शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेले आदेश लागू राहतील. सध्या याबाबत खाली नमूद केलेले आदेशानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

**सामाजिक आरक्षण (उभे आरक्षण)**

७३. सरळसेवेवरील नियुक्त्यांसाठी सामाजिक आरक्षण (उभे आरक्षण) अनुसूचित जाती १३%, अनुसूचित जमाती ७%, विमुक्त जाती (अ) ३%, भटक्या जमाती (ब) २.५% , भटक्या जमाती (ब)३.५%, भटक्या जमाती (ब) २% , विशेष मागास प्रवर्ग २% , इतर मागास वर्ग १९% असे राहील. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६.३.१९९९ )

७४. नगरपरिषद आस्थापनेवरील पदांचे सामाजिक आरक्षण हे या संचालनालयाने मान्य केलेल्या पदनिर्मितीच्या सुधारीत आकृतीबंधाच्या आदेशातील परिशिष्टात नमूद केलेल्या पदांच्या संवर्गनिहाय राहील.

७५. नगरपरिषद आस्थापनेवरील मागासवर्गीयांचा अनुशेष प्राधान्याने भरुन काढण्यांत यावा. अनुशेष काढतांना फक्त स्थायी पदे विचारात घेऊन काढण्यात यावा. अनुशेष विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्गीय कक्ष यांच्याकडुन प्रमाणित करण्यात यावा.

७६. सरळसेवा भरतीकरीता शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/१६-ब दि. २९.३.१९९७ नुसार विहित केलेली १०० बिंदू नामावली वापरावी. पदोन्नतीसाठी शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६ -ब, दि. १८.१०.१९९७ नुसार विहित केलेली १०० बिंदू नामावली वापरावी.

७७. सामाजिक आरक्षणाची रिक्त पदे बिंदू नामावलीनुसार भरली जातात ज्यामध्ये कोणत्या प्रवर्गातील उमेदवारास कोणत्या क्रमांकाच्या बिंदूवर निवडावयाचे याची माहिती देण्यांत आलेली आहे. जर बिंदू नामावलीनुसार एखादे पद आरक्षित असेल तर त्या प्रवर्गाशिवाय ते पद इतर प्रवर्गामधून भरता येत नाही. त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ते पद रिक्त ठेवावे लागते व भविष्यात होणाऱ्या भरतीसाठी त्या प्रवर्गाचा अनुशेष म्हणून आरक्षण पुढे ओढून सदर बिंदू त्याच प्रवर्गाच्या उमेदवारातून भरला जातो. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.न्याप्र.१००३/९९/प्र.क्र.२/०३ (भाग-२)/१६-अ, दि. २५ ऑक्टोबर, २००५)

७८. बिंदूनामावली ही आरक्षणाची विहित टक्केवारी पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवावयाची आहे. ज्या प्रवर्गाची विहित टक्केवारी पूर्ण होईल त्या प्रवर्गाकरिता बिंदू नामावली वापरण्याची आवश्यकता राहणार नाही, त्यानंतर ज्या प्रवर्गाचे पद रिक्त होईल ते त्या प्रवर्गातील कर्मचाऱ्याच्या नियुक्तीद्वारे भरण्यांत यावे व त्या बिंदू पुढे तो बिंदू त्या प्रवर्गासाठी उपयोगात आणला आहे अशी नोंद घ्यावयाची आहे. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.न्याप्र.१००३/९९/प्र.क्र.२/०३ (भाग-२)/१६-अ, दि. २५ ऑक्टोबर, २००५)

७९. मागासप्रवर्गाने विहित केलेले आरक्षण हे टक्केवारीनुसार असावे व एकूण आरक्षण हे प्रचलित आरक्षणानुसार संवर्गाच्या ५२% पेक्षा जास्त असता कामा नये. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि. १८ ऑक्टोबर, १९९७)

**विशेष आरक्षण (समांतर आरक्षण)**

८०. सरळसेवेवरील नियुक्त्यांसाठी विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) माजी सैनिक १५%, प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त ५%, अपंग ३%, आणि महिलांसाठी ३०% असे राहील. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६.३.१९९९)

८१. सरळसेवेवरील नियुक्त्यांसाठी विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी साठी ५% असे राहील. या समांतर आरक्षणासाठी शासनाच्या आदेशासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या मान्यताप्राप्त खेळामध्ये किमान राष्ट्रीय स्पर्धेतील प्रमाणपत्र प्राप्त उमेदवार पात्र असतील. ( संदर्भ : शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. राक्रीधो २००२/ प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दि. ३०.४.२००५ )

८२. विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत आरक्षण (Compartment) असून ते सरळसेवेवरील नियुक्त्यांसाठी लागू आहे. विशेष आरक्षणाचा (समांतर आरक्षण) सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येवू नये. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६.३.१९९९)

८३. अपंग प्रवर्ग वगळता इतर प्रवर्गासाठी (माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त /भूकंपग्रस्त, महिलांसाठी आणि खेळाडू) अनुशेष काढण्यात येवू नये. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६, दि.६.५.२००४)

८४. समांतर आरक्षणाने गट क मधील एकूण रिक्त पदांचा एक संवर्ग व गट ड मधील एकूण रिक्त पदांचा एक संवर्ग याप्रमाणे सरळसेवेने नियूक्ती करताना पदे दर्शवून भरण्यांत यावीत. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६, दि.६.५.२००४)

८५. अपंगांचे आरक्षण सर्व गटातील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी लागू आहे. त्याचप्रमाणे अपंगांच्या पदोन्नतीसाठी हे आरक्षण फक्त गट ड मधून गट ड मधील, गट ड मधून गट क मधील व गट क मधून गट क मधील पदांसाठी लागू आहे. (संदर्भ: शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६, दि.६.५.२००४ )

८६. अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५, नुसार शासन निर्णय नगर विकास विभाग निर्णय क्र.जीईएन १२०४/५५९/प्र.क्र.१०७/०४/नवि-१४, दि.१८.८.२००५ मधील परिशिष्ट-अ मधील पदांना लागू आहे व परिशिष्ट-ब मधील पदे अपंगांचे आरक्षणातून वगळण्यांत आलेली आहेत.

८७. विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) भरताना खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

अ) प्रथम सामाजिक आरक्षण व खुल्या प्रवर्गातून भरावयाच्या पदांची संख्या निश्चित करावयाची आहे. या पदांमध्ये कप्पीकृत (Compartment) करून विशेष आरक्षण (समांतरआरक्षण) अंतर्गत पदांची संख्या निश्चित करावयाची आहे.

ब) समांतर आरक्षण भरण्यासाठी नगरपरिषदेने गट `क` आणि गट `ड` साठी रिक्त होणा-या पदांची १०० बिंदू नोंदवही ठेवावी.

क) बिंदू नोंदवहीमधील क्रमांक १, ३४ व ६७ हे बिंदू अपंगांसाठी शासनाने विहीत केले आहेत . त्यामुळे समांतर आरक्षणाची सुरुवात अपंगाच्या भरतीने करावयाची आहे. या बिंदूमधील एखादा बिंदू अपंग व्यक्तीसाठी अनारक्षित ठरविलेल्या पदाचा असेल तर अपंग व्यक्तीसाठी आरक्षित ठरविलेल्या पदाचा पुढील नजिकचा बिंदू विचारात घ्यावा. अपंगाच्या विविध प्रवर्गासाठी सुयोग्य ठरविलेली पदे विचारात घेऊन अपंगांच्या अंध, अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग किंवा मेंदूचा पक्षघात या तिनही प्रवर्गामध्ये शक्यतो समान भरती होईल याची दक्षता घ्यावी. यासाठी अपंगांच्या कोणत्याही प्रवर्गापासून आरक्षणाची सुरवात करता येईल. तथापि हे करतांना अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग किंवा मेंदूचा पक्षघात ही क्रमवारी ठेवण्यांत यावी. (संदर्भ : शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.अपंग १००३/प्रक्र.१२७/२००३/१६-अ दिनांक ६.५.२००४)

ड) समांतर आरक्षणातून रिक्त पद भरताना जर सामाजिक आरक्षणाचा अनुशेष असेल तर त्या प्रवर्गातून भरावा आणि जर अनुशेष नसेल तर खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षण भरावे.

इ) समांतर आरक्षणातून नेमलेला उमेदवार हा आरक्षण बिंदु नामावलीमध्ये त्या त्या प्रवर्गामध्ये गणला जाईल. उदा. अनुसूचित जातीचा उमेदवार हा अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या बिंदुवर गणला जाईल.

८८. भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाला नाही तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यांत यावे. महिलांच्या आरक्षाणाचा अनुशेष पुढे ओढण्यांत येवू नये. या अटीचे पालन करण्यांत यावे. (संदर्भ : शासन महिला व बालविकास विभाग निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दिनांक २५.५.२००१ मधील परि-१ अनु क्र. ७ व ८ )

८९. अपंगाच्या ज्या विशिष्ट प्रवर्गाची मागणी करण्यात आली आहे. त्या प्रवर्गाचा उमेदवार एखादया भरती वर्षात उपलब्ध न झाल्यास अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूद क्र. ३६ अनूसार हे पद पुढील भरती वर्षापर्यंत रिक्त ठेवावयाचे आहे. केंद्र शासनाच्या या संबंधातील धोरणानुसार हे आरक्षण तीन भरती वर्षापर्यंत पुढे ओढावयाचे आहे. दरम्यानच्या कालावधीत अपंगाच्या तीनही प्रवर्गामध्ये आंतरबदल करून सुयोग्य उमेदवार उपलब्ध झाल्यास पद भरावयाचे आहे. असे करुनही सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास तिस-या भरती वर्षानंतर ते पद आरक्षण मुक्त करुन अपंग उमेदवाराव्यतिरिक्त उमेंदवारातून पद भरावे. (संदर्भः शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६, दि.६.५.२००४ )

९०. माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त, महिला, खेळाडू व अपंग या प्रवर्गातील समांतर आरक्षण भरण्याची कार्यवाही करतांना नगरपरिषदेने वर्ग-३ च्या पदांसाठी जिल्हानिवड समितीकडे मागणीपत्र पाठविणे आवश्यक आहे. मागणीपत्रामध्ये वरील आरक्षण स्पष्टपणे दर्शविण्यांत यावे.

**पदांची वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणी व भरतीची कार्यपध्दत**

९१. नगरपरिषद आस्थापना पदांच्या पदभरतीमधील वयोमर्यादेबाबत शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेले आदेश लागू राहतील. सध्या उमेदवाराची नगरपरिषद आस्थापनेवरील पदभरतीमध्ये वयोमर्यादा ही १८ ते ३३ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५ वर्षे शिथिल अशी राहील.

९२. शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणी व भरतीची कार्यपध्दत/प्रमाण हे नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधाच्या आदेशामध्ये विहित केल्याप्रमाणे असेल.

**आदेशाचे पालन न केल्यास करावयाची कार्यवाही.**

९३. शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दती व्यतिरिक्त तसेच उपरोक्त नमूद केलेल्या कार्यपध्दती व्यतिरिक्त अन्य नियमबाहय रितीने व अपात्र असलेला कर्मचारी नियुक्त केल्यास तसेच रोजंदारी / हंगामी / खाडा बदली / कंत्राटी / मानधन वर कर्मचारी नियुक्त केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषद मुख्याधिकारी यांचेवर राहील, व अशा प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन बेकायदेशीर नियुक्तीच्या वेतनावर झालेला खर्च महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार या कार्यालयाचे पत्र क्र.नप्रसंई १००३/प्र.क्र.३६८/०३/५ दिनांक ३.१.२००४ व स्थायी निदेश क्र. २१ क्र.नप्रसंई १००३/ प्र.क्र.३६५/०३/५, दि. १५ जानेवारी, २००४ नुसार निश्चित होऊन वसूलीस पात्र राहील.

**अडचणी दूर करण्याची शक्ती**

९४. या आदेशाच्या अंमलात आणण्याच्या कामात जर काही अडचण उद्भवली तर त्या प्रसंगी जरुर असेल त्याप्रमाणे ती अडचण दूर करण्यासाठी संचालकांचे आदेश अंतिम राहतील.

९५. उक्त आदेशाचे वाचन नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत करण्यांत येऊन तशी नोंद कार्यवृत्तात घेण्यांत यावी.

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति:

१) मुख्याधिकारी नगरपरिषद, (सर्व), २) जिल्हाधिकारी (सर्व)
३) प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (सर्व), ४) उपमुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा (सर्व)